| | | |
|---|---|---|
| MHRG070013112022 | केस दाखल दिनांक | १५/०९/२०२२ |
| | केस नोंदणी दिनांक | १५/०९/२०२२ |
| | केस निकाल दिनांक | ०९/०७/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | | ०३ ०९ २४ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए. एस. वाडकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४१५/२०२२**
**निशाणी क्र.१७/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>गुन्हा नोंद क्रमांक : २०२/२०२२, दिनांक ०५/०७/२०२२<br>पोलीस स्टेशन : नेरळ पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड | |
| तक्रारदार/खबरी | श्री. आर.के. पिंगळे<br>पोलीस हवालदार,<br>नेमणूक: नेरळ पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्रीमती सरोज नागोठकर, सहा. सरकारी अभियोक्ता.<br>श्री प्रदिप शिरसाट, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **मनोहर नारायण राठोड**<br>वय : ४८ वर्षे, व्यवसाय : कॉन्ट्रॅक्टर,<br>राहणार : विश्वी बुडस पार्क, सोसायटी जी. विंग,<br>रुम नं.०२, शेलू बांधीवली, ता. कर्जत, जि. रायगड |
| आरोपीतर्फे वकील | श्री. सूर्यकांत मसणे. |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४/०७/२०२२ |
| गुन्हा नोंदणी तारीख | ०५/०७/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १५/०९/२०२२ |

| | |
|---|---|
| प्रतिकथन निश्चित तारीख | १७/०३/२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २८/०८/२०२४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ०९/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मनोहर नारायण राठोड | दिनांक ०७/०७/२०२२ रोजी न्यायालयात हजर. | ०७/०७/२०२२ | भारतीय दंड विधान संहिता, कलम ३०४(अ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील** :-

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | दिपेश गणपत गवळी | ९ |
| २. | गोपाल धनजी दुबारिया | १३ |
| २. | रामनरेश राम हजुरे वर्मा | १४ |
| ३. | मंगेश माहदू गायकवाड | १७ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :-
**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा | १० |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :-

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (जाहीर दिनांक ०९/०७/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(अ) अन्वये चालविण्यात आला.

## अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

०२. दिनांक ०४/०७/२०२२ रोजी १२.३० वाजताचे सुमारास मौजे शेलू बांधीवली, ता. कर्जत गावच्या हद्दीत असलेल्या सुंदरम बिल्डींगच्या कंट्रक्शनचे कॉन्ट्रॅक्टर हे आरोपी होते. बांधकाम चालू असलेल्या बिल्डींगचे बांधकामवर काम करीत असलेल्या मजुरांचे होणा–या अपघाताची सर्व जबाबदारी त्यांचेवर असल्याचे कोटेशन अॅग्रीमेंटमध्ये नमूद असताना देखील आरोपी यांनी सदर कामागारांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेले सेफ्टी बेल्ट, हेल्मेट गमबूट देणे तसेच काम चालू असलेल्या बाहेरील ठिकाणी संरक्षक जाळी लावणे बंधनकारक असताना त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करुन, हयगय करुन, निष्काळजीपणा दाखवून बेजबाबदारपणे वागून, काम चालू असताना कामगार मयत इसम सुरजकुमार पतिराम चौधरी हा पाचव्या मजल्यावरुन पाय घसरुन त्यांचा तोल जावून पहिल्या मजल्यावर पडून त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत होवून त्यांच्या मृत्यू झाला. तरी सदर मृत्यस आरोपी हे कारणीभूत असून, त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द सदरची फिर्याद नेरळ पोलीस स्टेशन येथे दाखल केली.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र.२०२/२०२२ भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा नोंदविला गेला. तपासी अंमलदार यांनी तपासामध्ये फिर्यादीचा जबाब नोंदविला, मरणोत्तर पंचनामा तयार केला, घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, तपास पुर्ण होताच आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने वरील कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३०४(अ) अन्वये आरोपीचा प्रतिकथन नोंदविले. आरोपीस गुन्हयाचे विवरण त्याचे मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले असता आरोपीने आरोप नाकारुन संपरीक्षेची मागणी केली. दिनांक ०६/०६/२०२६ रोजी निशाणी क्र.१६ येथे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वये घेण्यात येणारा जबाब नोंदविण्यात आला.

०५. फिर्यादी पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक ०४/०७/२०२२ रोजी १२.३० वाजताचे सुमारास मौजे शेलू गावच्या हद्दीत चालू असलेल्या बिल्डींगचे कंट्रक्शनचे बांधकामाचे ठिकाणी काम करीत असलेल्या मजुर यांच्या सुरक्षिततेच्या सेफ्टी बेल्ट, हेल्मेट गम बूट देणे आवश्यक असताना देखील त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करुन तसेच बिल्डींगचे बाहेरील ठिकाणी संरक्षक जाळी न लावता हयगय करुन निष्काळजीपणा दाखवून बाजूस मयत इसम सुरजकुमार पतिराम चौधरी हा पाचव्या मजल्यावरुन पाय घसरुन त्यांचा तोल जावून पहिल्या मजल्यावर पडून त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाला का ? | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करण्यात आली. |

## कारणमीमांसा

०६. अभियोग पक्षातर्फे दिपेश गणपत गवळी (साक्षीदार क्र.१ – निशाणी क्र.९) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०५/०७/२०२२ रोजी पोलीसांनी त्यांना सुंदरम कॉम्प्लेक्स, शेलू स्टेशनजवळ असलेल्या साईटवर बोलावले होते. पोलीसांनी त्यांना एक कामगार त्यांच्या साईटवर पडलेला होता, ते ठिकाण दाखविण्यास सांगितले. त्यांनी त्यांना ते ठिकाण दाखविले. पोलीसांनी त्यांचे फोटो घेतले व त्यांच्या सहया घेतल्या. त्यावेळेस त्यांच्यासोबत विनोद पोस्तुरे हे सुध्दा हजर होते. त्यांना अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. सदर पंचनाम्यावर अनु. क्र.१ वर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर त्यांना माहीत नाही. त्यांना अभिलेखावरील १२ फोटो/छायाचित्रे दाखविण्यात आले. सदर छायाचित्रे ही घटनास्थळी काढण्यात आलेली आहेत. आरोपीतर्फे वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास नाकारला आहे.

०७. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार गोपाल धनजी दुबारिया (साक्षीदार क्र.२ – निशाणी क्र.१३) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी असे कथन केले की, ते आरोपी मनोहर राठोड यास ओळखतात. त्यांनी त्यांना बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. त्या संदर्भात त्यांनी कागदपत्रे तयार केली होती. ते तीन भागीदार बांधकाम व्यवसाय करतात. त्याप्रमाणे सर्वे नं.२३, बांधिवली शेलू येथे त्यांचे बांधकाम चालु होते. तेथे पाचव्या मजल्यावरुन एक मजुर बाल्कनीमधुन पडला होता. त्यामुळे तो मजुर मयत

झाला होता. सदर मजुराला मनोहर राठोड याने कामावर ठेवले होते. त्यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था करणे अपेक्षित होते. पोलीसांना त्यांनी जबाब दिला होता. घटनेच्या ठिकाणी मजुर घसरल्यामुळे सदरचा अपघात झाला होता.

०८. आरोपीतर्फे वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने असे कथन केले आहे की, ते घणसोली येथे राहतात. ते आठवडयातुन दोन ते तीन वेळा बांधकाम साईटवर भेट देत असत. त्यांची साईट ही बांधिवली येथील सर्वे नं.२३ वर चालु होती. आरोपी हा त्यांच्या मजुरांना सेफ्टी बेल्ट, हेल्मेट व गनबुट पुरवित होता. आरोपीने मजुराला सेफटी बेल्ट, हेल्मेट व गनबुट पुरविले होते. घटनेच्या वेळेस पाचव्या मजल्याच्या स्लॅबचे काम चालु होते. त्यावेळेस संरक्षित जाळी ही पहिल्या मजल्यावर लावली होती. आरोपीने मजुरांची पुर्ण काळजी घेतली होती. त्यांचा जबाब हा मराठीतुन लिहीला असल्यामुळे त्यांना त्यातील मजकुराबाबत माहिती नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब लिहीला व त्यांनी त्यावर सही केली. पोलीसांनी आरोपीवर खोटा गुन्हा दाखल केला आहे किंवा नाही याबाबत त्यांना सांगता येणार नाही. पोलीसांनी नोंदविलेल्या गुन्हयाबाबत त्यांना विशेष माहिती नाही.

०९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार रामनरेश राम हजुरे वर्मा (साक्षीदार क्र.३ – निशाणी क्र.१४) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी असे कथन केले की, ते सन २०१६ पासुन सेंटरींगचे काम करीत आहेत. ते सदरचे काम आरोपीसोबत करीत होते. घटनेच्या वेळेस त्यांचे शेलू सुंदरम या इमारतीचे काम चालु होते. त्यावेळेस ते व त्यांच्यासोबत त्यांचे भाऊजी सुरजकुमार चौधरी हे होते. त्यावेळेस सदर इमारतीवर सुरज राजपाल,

कन्हैय्यालाल हे सुध्दा काम करीत होते. दिनांक ०४/०७/२०२२ रोजी ते सर्वजण सदर इमारतीच्या बांधकामाकरिता गेले होते. त्यावेळेस तेथे पाचव्या मजल्यावर सुरजकुमार चौधरी यांचा पाय घसरला व तो पहिल्या मजल्यावर येऊन पडला. त्यानंतर त्याला ते सरकारी दवाखान्यात घेऊन गेले होते. घटनास्थळी त्यावेळेस सुरक्षेच्या दृष्टीने व्यवस्था केली होती. घटनास्थळी जाळी बसविण्यात आली होती. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला होता.

१०. आरोपीतर्फे वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने असे कथन केले आहे की, त्यांचे पाचवीपर्यंत शिक्षण झालेले आहे. त्यांचे शिक्षण हिंदी भाषेतुन झालेले आहे. ते आरोपीस सन २०१६ पासुन ओळखतात. आरोपीची वर्तणुक चांगली आहे. दिनांक ०४/०७/२०२२ रोजी त्यांचे भाऊजी पडल्यानंतर ते स्वतः पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले नव्हते. आरोपी हा प्रत्येक मजुराला हेल्मेट, सेफ्टी बेल्ट व गनबुट देतात. संरक्षण जाळी ही तळमजला व पहिल्या मजल्याच्यामध्ये लावण्यात आली होती. आरोपीने प्रत्येक मजुराच्या सुरक्षिततेची पुर्ण काळजी घेतली होती. त्यांचा जबाब पोलीसांनी मराठी भाषेतुन लिहीलेला आहे. त्यांना मराठी भाषा वाचता येत नाही. पोलीसांनी त्यांना त्यांच्या जबाबातील मजकुर हिंदी भाषेतुन समजावुन सांगितला नाही. सदर जबाबावर पोलीसांनी सांगितल्यावरुन त्यांनी सही केली होती. सदर जबाबामध्ये काय लिहीले आहे ते त्यांना माहीत नाही.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार मंगेश माहदू गायकवाड (साक्षीदार क्र.४ – निशाणी क्र.१७) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी असे कथन केले की, घटना कधी घडली होती ते त्यांना आठवत नाही. त्या दिवशी काहीही घटना घडली नव्हती. दिनांक –०४/०७/२०२२ रोजी

१२.४५ वाजता ते बॅंकेत जात असताना सुंदरम बिल्डींगच्या खालून जात असताना त्यांनी पाहिले की, एक इसम बी विंग मधील पहिल्या मजल्यावरील गॅलरीमधून खाली पडलेल्या अवस्थेत होता, त्यांच्या डोक्यातून रक्त स्त्राव पाहिला, असे काहीही घडले नाही.

१२. आरोपीतर्फे वकिलांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने असे कथन केले आहे की, सुंदरम कॉम्पलेक्सच्या खाली घटनेच्यावेळी संरक्षित जाळी बसवलेली होती.

१३. अभियोग पक्षाचे कथन असे आहे की, दिनांक ०४/०७/२०२२ रोजी १२.३० वाजताचे सुमारास मौजे शेलू गावच्या हद्दीत चालू असलेल्या बिल्डींगचे कंट्रक्शनचे बांधकामाचे ठिकाणी काम करीत असलेल्या मजुर यांच्या सुरक्षिततेच्या सेफ्टी बेल्ट, हेल्मेट गम बूट देणे आवश्यक असताना देखील त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करुन तसेच बिल्डींगचे बाहेरील ठिकाणी संरक्षक जाळी न लावता हयगय करुन निष्काळजीपणा दाखवून बाजूस मयत इसम सुरजकुमार पतिराम चौधरी हा पाचव्या मजल्यावरुन पाय घसरुन त्यांचा तोल जावून पहिल्या मजल्यावर पडून त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याच्या मृत्यू आरोपीच्या निष्काळाजीपणामुळे झाला. वरील साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी याने घटनेच्या ठिकाणी सुरक्षेची व्यवस्था केली नव्हती, अशा स्वरुपाचा कोणातही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. साक्षीदार क्रं.१, २ व ४ यांनी अभियोगपक्षास सहाय्य होईल असा पुरावा दिलेला नाही. अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरुध्द गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकला नाही. सबब, आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे.

१४. अभियोगपक्षाने तपासलेल्या वर नमुद साक्षीदारांच्या पुराव्यातुन ही बाब कोठेही सिध्द होत नाही की, ०४/०७/२०२२ रोजी १२.३० वाजताचे सुमारास मौजे शेलू गावच्या हद्दीत चालू असलेल्या बिल्डींगचे कंट्रक्शनचे बांधकामाचे ठिकाणी काम करीत असलेल्या मजुर यांच्या सुरक्षिततेच्या सेफ्टी बेल्ट, हेल्मेट गम बूट देणे आवश्यक असताना देखील त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करुन तसेच बिल्डींगचे बाहेरील ठिकाणी संरक्षक जाळी न लावता हयगय करुन निष्काळजीपणा दाखवून बाजूस मयत इसम सुरजकुमार पतिराम चौधरी हा पाचव्या मजल्यावरुन पाय घसरुन त्यांचा तोल जावून पहिल्या मजल्यावर पडून त्याच्या डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाला, याबाबत कुठलाही ठोस पुरावा आलेला नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** –

१५. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष हा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **मनोहर नारायण राठोड** यांना भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३०४(अ), या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | सदर खटल्यामध्ये कोणताही मुद्देमाल जप्त नसल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. |

| | |
|---|---|
| ४. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणेकरिता आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्र द्यावयाचे आहे. |
| ५. | प्रकरण बंद करण्यात येते.<br>(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

ASAVARI SURESH WADKAR

Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.07.09 18:57:34 +0530

दिनांक – ०९/०७/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड